# ४. नविन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम

**योजनेचे उदेश** :-- ग्रामीण भागातील लाभार्थीना अनुदानावर बायोगॅसचा लाभ देवुन पर्यावरण रक्षण तथा ग्रामीण स्वच्छता व आरोग्य संवर्धनास सहाय्य.

**लाभाचे स्वरुप** :- २ घन मीटर वा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या बायोगॅसला रु.१२०००/- ( अनु.जाती /अनु. जमाती करीता रु १३०००/-) च्या मर्यादेत लाभ दिला जातो.तसेच संडास जोडणी असल्यास रु.१६००/- अतिरीक्त अनुदान देय आहे(उपलब्ध झाल्यास)

**लाभार्थी निवडीचे निकष** :-- बायोगॅसचा लाभ घेवु इच्छिणारे व किमान २ गुरे असणारे सर्व लाभार्थी पात्र राहतील.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्र :--**

१) लाभार्थ्याचा मागणी अर्ज

२) अनुदान पावती व जागा उपलब्धते बाबत पुरावा ( ७/१२, ८ अ ंकिंवा ग्रा.से. दाखला, ग्रा.पं.ठराव)

३) आधारकार्ड

४) आधारलिंक बँक खाते .

५) १ मे २००१ नंतर तिसरे अपत्य नसल्याचा ग्रामसेवक दाखला

**योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा** :- कृषि विभाग, संबंधित पंचायत समिती